# निर्भया समिती अहवाल २०२५-२०२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत निर्भया समिती व विद्यार्थी विकास मंडळ मएसो आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने २४ जानेवारी २०२६ रोजी निर्भय कन्या अभियान  कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये पहिल्या सत्रात श्री श्रीकांत तिळवे यांनी विद्यार्थीनीना व्यक्तिमत्व कसे विकसित केले पाहिजे त्याचबरोबर  आरोग्याची काळजी कशी घेतली पाहिजे  यांचे मार्गदर्शन केले. तसेच दुसऱ्या सत्रात  श्री निरंजन गाडे व त्यांचे सहकारी कल्याणी दारवटकर यांनी मुलींना स्व-संरक्षणाचे कराटे प्रशिक्षण दिले. व तिसऱ्या सत्रात प्रा. डॉ. अमित प्रभू यांनी विद्यार्थीनीना आरोग्य व आहार कसा असावा याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. विलास उगले, कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. डॉ. आशा बेंगळे व विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सागर दखणे, सर्व शिक्षक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ.आशा बेंगळे यांनी केले. सूत्रसंचालन व व्याख्यात्यांचा परिचय भक्ती धावले आणि साक्षी शिवतारे या विद्यार्थिनींनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलास उगले यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले व आभार प्रा.दखणे यांनी मानले.











प्रा.डॉ.आशा बेंगळे
शा.शि.व क्रीडा संचालक

प्रा.डॉ.विलास उगले
प्राचार्य

# निर्भया समिती अहवाल २०२४-२०२५

दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त निर्भया समिती म.ए.सो.आबासाहेब गरवारे महाविद्यालय(स्वायत्त) यांच्यावतीने विद्यार्थिनींसाठी लाठी-काठीचे प्रशिक्षण घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विलास उगले,रजिस्ट्रार डॉ. अविनाश गोरे तसेच शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या संचालिका प्रा. डॉ. आशा बेंगळे, सहाय्यक प्राध्यापक गोकुळ गोपाळघरे, इतर प्राध्यापक वर्ग, शिवकालीन युद्ध कलेचे प्रशिक्षक श्री प्रतीक वऱ्हाडी, सौ. शितल वऱ्हाडी,कु.श्रावणी बटवाल, कु.वरद भाडाईत आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पित करून शिव आरतीने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

पुढे शिवकालीन युद्धकलेतील प्रसिद्ध लाठीकाठीचे प्रात्यक्षिक श्रावणी बटवाल व शीतल वऱ्हाडी यांच्याद्वारे सादर करण्यात आले. यादरम्यान सादर केले गेलेले शिवकालीन युद्धकलेतील साधी चौमुखी, बगल चौकमुखी, डबल काठी, फटकी, भाला व लट इत्यादी प्रकारांची प्रात्यक्षिके व माहिती देण्यात आली यावेळी महाविद्यालयातील साधारण 200 विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रात्यक्षिकांना उपस्थित होते. पुढे काही विद्यार्थिनींना प्रत्यक्ष लाठीकाठीचे प्रशिक्षण देण्यात आले. व प्राचार्यांच्या संमतीने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी आठवड्यातील दोन दिवस सोमवार व शुक्रवार या दिवशी मैदानात लाठीकाठीचे मोफत  प्रशिक्षण देण्याचे ठरविले.






प्रा.डॉ.आशा बेंगळे
शा.शि.व क्रीडा संचालक

प्रा.डॉ.विलास उगले
प्राचार्य

# निर्भया समिती अहवाल २०२४-२०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत निर्भया समिती व विद्यार्थी विकास मंडळ म ए सो आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ३० डिसेंबर २०२४ रोजी निर्भय कन्या अभियान कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये पहिल्या सत्रात श्री लतेंद्र भिंगारे यांनी मुलींना व्यक्तिमत्व कसे विकसित केले पाहिजे त्याचबरोबर आरोग्याची काळजी कशी घेतली पाहिजे यांचे मार्गदर्शन केले. तसेच दुसऱ्या सत्रात श्री. भिंगारे व त्यांचे सहकारी निरंजन गाडे, अनिकेत तावरे , सिमरन सैयद यांनी मुलींना स्व-संरक्षणाचे कराटे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. विलास उगले, उपप्राचार्य डॉ अपर्णा आगाशे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ आशा बेंगळे व विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सागर दखणे, सर्व प्राध्यापिका व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ आशा बेंगळे यांनी केले. सूत्रसंचालन व व्याख्यात्यांचा परिचय भक्ती धावले आणि साक्षी शिवतारे या विद्यार्थिनींनी केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलास उगले यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. आभार प्रा.दखणे यांनी केले.







| | |
|---|---|
| प्रा.डॉ.आशा बेंगळे | प्रा.डॉ.विलास उगले |
| शा.शि.व क्रीडा संचालक | प्राचार्य |